follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 ❋ वर्ष २५ ❋ अंक २८७ सातारा ❋ रविवार ❋ दि. ३० जून २०२४ ❋ पाने ८ ❋ किंमत ५ रू/

# भारत ठरला विश्वविजेता



## सूर्यकुमार यादवचा झेल आणि जसप्रीत बुमराहचे षटक ठरला टर्निंग पॉईंट

**मुंबई :** भारतीय संघाने १० वर्षांचा आयसीसी ट्रॉफिचा दुष्काळ संपवत भारताने टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावले आहे. सूर्यकुमार यादवचा अखेरच्या षटकातील झेल आणि जसप्रीत बुमराहच्या भेदक गोलंदाजीसह भारत टी-२० चॅम्पियन ठरला.. भारताने रोमहर्षक सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव करत अंतिम सामन्यात आश्चर्यकारक विजय मिळवला आहे. रोहित शर्मा, हार्दिक पंड्यासारखे भारताच्या सर्वच खेळाडूंच्या डोळ्यातून विजयाश्रू आले.

शेवटच्या षटकाच्या शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या रोमहर्षक सामन्यात टीम इंडियाने १४० कोटी भारतीयांचे स्वप्न साकारले. २००७ मध्ये एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ चॅम्पियन बनला होता. त्यानंतर रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघाने विजय मिळवत सर्वांचे स्वप्न साकारले. सामन्यातील अखेरच्या षटकात हार्दिक पंड्याने दमदार गोलंदाजी केली. भारताला विजयासाठी ६ षटकांत १६ धावांची गरज होती. तर मैदानात मिलर आणि केशव महाराजची जोडी होती. हार्दिकने फुलटॉस चेंडू टाकला जो मिलरने जोरदार फटका लगावला पण सीमारेषेवर उभा असलेल्या सूर्याने आश्चर्यकारक झेल टिपला आणि भारताच्या दिशेने सामना फिरवला.

तर बुमराहने १८व्या षटकात २ धावा देत पुन्हा एकदा भारताच्या विजयाच्या आशा वाढवल्या. या षटकात बुमराहने चौथ्या चेंडूवर यान्सनला क्लीन बोल्ड केले.

अखेरच्या चार षटकांमध्ये भारतीय गोलंदाजांनी सामना फिरवला. २४ चेंडूवर दक्षिण आफ्रिकेला २६ धावांची गरज होती. त्यावेळी हार्दिक पांड्या, जसप्रीत बुमराह, अर्शदीप यांनी भेदक मारा केला. त्याला जोड सूर्यकुमार यादवच्या फिल्डिंगची मिळाली. सूर्यकुमार यादवने मोक्याच्या क्षणी डेविड मिलर याचा झेल घेतला. भारतीय संघाने ११ वर्षांनंतर अखेर आयसीसी चषकावर नाव कोरलेय. टी२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव केला.

भारताने १७७ धावांच्या आव्हानाचा यशस्वी बचाव केला. बार्बाडोसच्या मैदानात भारताने इतिहास रचला. २००७ नंतर भारतीय संघाने टी२० विश्वचषकावर नाव कोरलेय. विराट कोहली आणि अक्षर पटेल यांनी फलंदाजीमध्ये शानदार कामगिरी केली. गोलंदाजीमध्ये हार्दिक पांड्या, बुमराह आणि अर्शदीप यांनी शानदार गोलंदाजी केली. रोहित शर्मा २००७ आणि २०२४ विश्वचषक जिंकणारा एकमेव खेळाडू ठरला आहे.

भारताच्या गोलंदाजांनी भेदक मारा करत सामना फिरवला. अर्शधीप सिंह याने ४ षटकात २० धावांच्या मोबदल्यात दोन फलंदाजांना तंबूत पाठवले. जसप्रीत बुमराहने आपल्या षटकात फक्त १८ धावा खर्च करत दोन विकेट घेतल्या आहेत. हार्दिक पांड्याने ३ षटकात २० धावांच्या मोबदल्यात ३ विकेट घेतल्या. अक्षर पटेल याला एक विकेट मिळाली.

१७७ धावांच्या आव्हानाचा बचाव करताना भारतीय गोलंदाजांनी शानदार सुरुवात केली. रीजा हेंड्रीक्स आणि कर्णधार एडन माक्रमक लवकर तंबूत परतले. हेंड्रिक्स ४ आणि माक्रमक चार धावा काढून तंबूत परतले होते. आफ्रिका १२ धावांवर दोन बाद अशी स्थिती होती. पण त्यानंतर स्टब्स आणि डी कॉक यांनी आफ्रिकेच्या डावाला आकार दिला.दोघांनी चौफेर फटकेबाजी करत धावसंख्या वाढवली. अक्षर पटेल याने स्टब्सचा अडथळा दूर करत भारताला यश मिळवून दिले. पण त्यानंतर क्लासेन यानं डिकॉकच्या साथीने धावसंख्या वाऱ्याच्या वेगानं वाढवली.

# बीडच्या परळीत गोळीबार

## अजित पवार गटातील सरपंचाचा जागीच मृत्यू, तर दोन जण जखमी

**बीड :** परळीत गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. परळीतील येथील बँक कॉलनीत ही घटना झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली असून यामध्ये एक ठार तर एक गंभीर जखमी असल्याचे माहिती आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मरळवाडीचे सरपंच बापू आंधळे यांचं निधन झालं आहे. या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल



झाले असून याप्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, परळीतील येथील बँक कॉलनीत परिसरात गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. यामुळे परिसरात एकच खळबल माजली आहे. या गोळीबारात एकाचा जागीच मृत्यू झाला आहे, तर आणखी दोन व्यक्ती गंभीर जखमी झाले असून त्याच्या जवळील परळी जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अजित पवार गटातील धनंजय मुंडे समर्थकाचा मृत्यू झाला आहे.

**धनंजय मुंडे समर्थक सरपंच बापूराव आंधळे जागीच ठार**

या गोळीबारात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट धनंजय मुंडे समर्थक मरळवाडीचे विद्यमान सरपंच बापूराव आंधळे यांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे, तर नंदागौळ येथील ग्यानबा मारोती गित्ते जखमी झाले आहेत. दरम्यान, हा गोळीबार नेमक्या कोणत्या कारणामुळे झाला आणि कुणी केला याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. या प्रकरणाचा पोलिसांकडून तपास सुरु आहे.

**बबन गीते यांचा सहकारी महादेव गीतेही जखमी**

या गोळीबारात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते बबन गीते यांचा सहकारी महादेव गीते यांनाही गोळी लागली त्यांच्यावर अंबाजोगाई च्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या गोळीबार प्रकरणांमध्ये एक ठार तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.



# राज्याचा अर्थसंकल्प, विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून

## खासदार शरद पवार यांची टिका...

**कोल्हापूर :** राज्याचा अर्थसंकल्प हा विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मांडण्यात आलाय. ज्या गोष्टी प्रत्यक्ष कृतीत येणार नाहीत, त्या गोष्टींची मांडणी अर्थसंकल्पात करण्यात आली. ज्या तरतुदी केल्या, त्या लोकांच्या पर्यंत पोहचण्यात अनेक वर्ष लागतील. आम्ही काहीतरी भयंकर करतोय असं दाखवण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून करण्यात आल्याची टीका, राष्ट्रवादीचे नेते खासदार शरद पवार यांनी केली. कोल्हापुरात ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते खासदार शरद पवार कोल्हापूर दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आगामी विधानसभा निवडणुकीवर बोलताना शरद पवार यांनी, होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी आमच्या सोबत कोण येणार याची माहिती नाही. तसा काही प्रास्ताव नाही. लोकसभेसाठी राज्यात १८ ठिकाणी पंतप्रधान मोदींनी सभा घेतल्या. त्यातील अनेक जागा आम्हाला मिळाल्या. आता आगामी निवडणुकीत मोदींनी जास्तीत जास्त सभा घ्याव्यात, डाव्या विचारसरणीचे घटक आणि मोदी विरोधी यांना विधानसभेसाठी सोबत घेणार आहोत असं सांगत येत्या विधानसभेला नवी समीकरणे असतील असे संकेतही शरद पवारांनी दिलेत. दरम्यान, राज्याचा अर्थसंकल्प मांडताना एक दिवस आधीच अर्थसंकल्पातील अनेक गोष्टी बाहेर आल्या होत्या. अर्थसंकल्पाबाबत गुप्तता ठेवायला पाहिजे. ती ठेवली गेली नाही. ज्या तरतुदी केल्या त्या विधानसभा डोळ्यासमोर ठेऊन केल्या आहेत. हा अर्थसंकल्प म्हणजे लोकांसाठी काहीतरी भयंकर करतोय असं दाखवणारा आहे. मात्र ज्या

तरतुदी केल्या आहेत त्या प्रत्यक्षात लोकांच्या पर्यंत पोहोचण्यासाठी अनेक वर्षे लागतील अशी टीकाही खासदार शरद पवार यांनी यावेळी केली. दरम्यानराज्यातील रिक्त झालेल्या पाच विधान परिषदेच्या जागा आम्हीं लढणार नसल्याचही त्यांनी स्पष्ट केल. केंद्रीय तपास यंत्रणानाचा गैरवापर केला गेला, आम्हीं यासंदर्भात लोकसभेत प्रश्न उपस्थित करणारं असल्याचं त्यांनी सांगितलं. नीट परीक्षेतील गोंधळ सरकारला थांबवता आला नाही, अशा प्रश्नांवर केंद्र सरकारला घेरण्याचा आमचा प्रयत्न असल्याचही पवार यांनी सांगितल. या पत्रकार परिषदेवेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष व्ही.बी. पाटील, माजी आमदार के. पी. पाटील, ए वाय पाटील , शहराध्यक्ष आर . के. पोवार, अनिल घाटगे आदी उपस्थित होते.

# सहकारी पक्षांबरोबरच राहून विधानसभेत बहुमत मिळविण्याची भाजपची रणनीती



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत भाजपचा राज्यात मोठा पराभव झाल्याने आणि त्याचे खापर महायुतीतील नेते एकमेकांवर फोडत असताना सहकारी पक्षांबरोबर राहूनच विधानसभा निवडणूक लढवायची आणि बहुमत मिळवायचे, अशी रणनीती भाजपने निश्चित केली आहे.

राज्याचा अर्थसंकल्प सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू ठेवून मांडला आहे. त्यामुळे योजना जनतेपर्यंत पोचविण्यासाठी सहकारी पक्षांच्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन १० जुलैपर्यंत अभियान राबविण्याचा निर्णय भाजपच्या केंद्रीय नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या विस्तारित सुकाणू समितीच्या बैठकीत शनिवारी घेण्यात आला.

विधानसभा निवडणुकीत जागावाटपावरून वाद होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भाजपच्या केंद्रीय नेत्यांच्या उपस्थितीत प्रदेश भाजपच्या विस्तारित सुकाणू समितीची बैठक प्रदेश कार्यालयात झाली. लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका व त्रुटी दूर करून विधानसभा निवडणुकीची तयारी कशी करायची, याविषयी बैठकीत चर्चा झाली.

सहकारी पक्षांबरोबर विधानसभा निवडणूक लढवायची आणि बहुमत मिळवायचे, अशी रणनीती भाजपने निश्चित केली असून त्या अनुषंगाने विस्तृत चर्चा झाली. भाजपला सर्वसामान्य जनतेचा आशीर्वाद असल्याने विधानसभेत बहुमत मिळेलच. असे शेलार यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितले.

**अमित शहांच्या उपस्थितीत बैठक**

भाजपच्या प्रदेश पदाधिकाऱ्यांची १३ जुलै रोजी तर विस्तारित कार्यसमितीची १४ जुलै रोजी पुण्यात बैठक होणार आहे. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित राहण्याची शक्यता आहे. विस्तारित कार्यसमितीच्या बैठकीसाठी राज्यभरातील सुमारे चार हजार पदाधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

# होर्डिंगच्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी समिती स्थापणार : उदय सामंत

**मुंबई :** घाटकोपरयेथे होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर जाग आलेल्या राज्य सरकारने आता जाहिरात फलकांच्या कायद्यासंदर्भात सुधारणा करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत तज्ज्ञांची नावे, काही सूचना आल्यास त्याचा स्वीकार करण्यात येईल, अशी माहिती उद्योगमंत्रीउदय सामंतयांनी विधानपरिषदेत दिली. घाटकोपरयेथील होर्डिंग दुर्घटनेचे पडसाद विधिमंडळातही उमटले. आमदार सुनील शिंदे यांनी अनधिकृत होर्डिंगसंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली. यावर माहिती देताना सामंत म्हणाले, घाटकोपर दुर्घटनेनंतर संबंधितांवर कारवाई झाली. आता होर्डिंगच्या धोरणात बदल करण्याचे योजले आहे.

रेल्वेच्या हद्दीत ४५ अनधिकृत होर्डिंग्ज आहेत. महापालिका म्हणते, आम्ही त्यांच्यावर कारवाई करू शकत नाही; पण दर महिन्याला पाकीट घ्यायला त्यांचा संबंध येतो. मग सरकार त्या होर्डिंगवर काय कारवाई करणार, सरकार धोरण तयार करीत असताना त्या समितीमध्ये नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारचा कोणी प्रतिनिधी आहे का, तज्ज्ञ मंडळींचा समावेश असणार काय, याचा खुलासा सरकारने करावा, अशी मागणी शिंदे यांनी केली.मंत्रीउदय सामंतम्हणाले, भविष्यात अशी घटना घडू नये, यासाठी शासन प्रयत्नशील असून डिजिटल होर्डिंग्जसंदर्भातही सर्वेक्षण केले जाईल. अनधिकृत असलेल्या होर्डिंग्जवर नियमानुसार कारवाई केली जाईल. दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. चौकशी सुरू असून तत्कालीन पोलिस आयुक्त, लोहमार्ग,मुंबईयांच्याकडून

प्रथमदर्शनी अनियमितता झाल्याचे निर्दशनास आल्याने त्यांना शासनाने निलंबित केले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिनियमानुसार सार्वजनिक रस्ते व पदपथावरून दृश्यमान होणाऱ्या जाहिरात फलकास परवानगी घेणे अनिवार्य आहे. शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिका

# स्टेट बँकेतील नोकरीचे आमिष दाखवून तरुणाला आठ लाखांचा गंडा

## जालन्याच्या दाम्पत्यासह तिघांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर :** भारतीय स्टेट बँकेत लिपीकपदाची नोकरी देण्याचे आमिष दाखवून सोलापुरातील एका तरुणाला आठ लाख रुपयांचा गंडा घातल्याप्रकरणी जालना येथील एका दाम्पत्यासह तिघाजणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. व्यंकटेश नागनाथ चौगुले (वय ३४, रा. अशोक चौक, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर) असे फसवणूक झालेल्या तरुणाचे नाव असून त्याने जेलरोड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार निर्मला रणधीर परदेशी व तिचा पती रणधीर तुळशीराम परदेशी आणि अब्दुल माजीद खान (तिघे रा. जालना) यांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. २०२० पासून चार वर्षांत चौगुले यास नोकरीच्या आमिषाने लुबाडले जात होते.

# पावसाळी अधिवेशनात सातारा जावळीच्या प्रश्नाबाबत आ. भोसले यांची तोफ धडधडणार

**मेढा :** महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळात पावसाळी अधिवेशन सुरू झालेले आहे. या अधिवेशनामध्ये सातारा जावळी मतदार संघातील विविध प्रश्न मांडण्यासाठी भाजपचे कर्तव्यदक्ष आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले हे मुंबईला निघाले आहेत. बोंडारवाडी धरण, औद्योगिक वसाहत व पर्यटन वाढीसाठी विधिमंडळाच्या अधिवेशनात आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची तोफ धडधडणार आहे. याचे संकेत मिळत आहे. त्याचबरोबर मराठा व इतर मागासवर्गीय आरक्षणाबाबतही ते भूमिका मांडणार आहेत.



सातारा व जावळी विधानसभा मतदारसंघाचे कर्तबगार भाजप आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी बोंडारवाडी धरणाच्या निर्मितीसाठी मंजुरी घेऊन दमदार सुरुवात केलेली आहे. गेली तेरा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या एक टी.एम.सी. धरणाची मागणी सातत्याने होत होती. यासाठी बोंडारवाडी धरण कृषी समितीचे निमंत्रक दिवंगत विजयकुमार मोकाशी यांच्यासह श्रमिक मुक्ती दलाचे डॉ. भारत पाटणकर, आदिनाथ ओंबळे एकनाथ ओंबळे, श्रीरंग बैलकर यांच्यासह ५४ गावातील ग्रामस्थांचं विशेष योगदान लाभलेले आहे.

यंदाच्या पावसाळी विधिमंडळाच्या मुंबईतील विधान भवन अधिवेशनात या प्रश्नाबाबत राज्य सरकारला उपयुक्त सूचना करण्यासाठी आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्याचबरोबर सातारा शहरानजिकं असलेल्या औद्योगिक वसाहतीच्या प्रश्नाबाबतही या अधिवेशनाचे आवाज उठवणार आहेत.

गेले ३० वर्षापासून साताऱ्यात औद्योगिक वसाहत वाढवणे. नागरी सुविधा देणे. उद्योग पूरक वातावरण निर्मिती करणे. आंतरराष्ट्रीय दर्जाची औद्योगिक वसाहत उभारणी करत असताना सामायिक प्रोत्साहित योजना १३ प्रमाणे सुधारित योजना राबवणे. औद्योगिक वसाहतीतील अतिक्रमण दूर करणे. फायर स्टेशन, पाणी, विज बिल पर्यावरण संरक्षण शुल्क कमी करणे. त्याचबरोबर ट्रक टर्मिनस उभारणे. राज्य कामगार विभाग योजना व दवाखाना अशा विविध प्रश्नांसाठी ते मुद्देसूद मांडणी करून मंत्रिमंडळाच लक्ष वेधून घेणार आहेत..

सातारा जावळी सारख्या निसर्गरम्य परिसरात पर्यटन वाढीसाठी उपयुक्त असणाऱ्या नागरी सुविधा देताना निधीची कमतरता पडू नये. यासाठीही ते पाठपुरावा करणार आहेत. त्यामुळे या पावसाळी अधिवेशनामध्ये खऱ्या अर्थाने आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची पुन्हा एकदा तोफ धडधडणार आहे. नुकत्याच झालेल्या सातारा लोकसभा निवडणुकीमध्ये आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अथक प्रयत्नाने व त्यांच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या प्रामाणिक सहकार्यामुळे भाजपचे सातारा मध्ये कमळ फुललेले आहे. त्यामुळे राजकीय दृष्ट्या आ. शिवेंद्रराजे भोसले यांचे राजकीय वजन वाढलेले असून त्यांनी केलेल्या मागण्या यावेळी पूर्ण होण्याचे शक्यता निर्माण झाल्या आहेत . राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री तसेच वरिष्ठ अधिकारी वर्ग सुद्धा त्यांच्या शब्दाला किंमत देत आहे. त्यामुळे अनेक प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी हे अधिवेशन उपयुक्त ठरेल असे दिसून येत आहे. सातारा व जावळी मतदार संघातील त्यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. आमदार भोसले यांच्या प्रयत्नाने सातारा जावळीचा विकास अधिक गतिमान होईल असा विश्वास जावळी व कुडाळ- सायगाव भागातील युवा नेते सौरव शिंदे, प्रवीण देशमाने, मुरलीधर शिंदे, सलीम आत्तार, राजेंद्र फरांदे- पाटील, अंकुश शिवणकर व बबलू जाधव, संदीप परामणे, फिरोज पठाण, ॲड. विक्रम पवार, राजू महाडिक, अभिजीत दुदुस्कर यांनी व्यक्त केला आहे. मुंबई येथे पावसाळी अधिवेशनात ला उपस्थित राहण्यापूर्वी त्यांनी साताऱ्यात पत्रकारांनी अनौपचारिक विचारलेल्या प्रश्नांबाबत माहिती दिली. या वेळेला जावळीचे युवा नेते सौरभ शिंदे उपस्थित होते.

# सातारा विधानसभेतील मतदान केंद्रांची पुनर्रचना करा

## भारतीय जनता पार्टीची मागणी : जिल्हा प्रशासनाला सादर केले निवेदन

**सातारा :** मतदान केंद्रावरील त्रुटी दुरुस्त करून मतदान केंद्राची पुनर्रचना करून मतदान केंद्रावरील मतदारांची संख्या कमी करावी अशी मागणी भारतीय जनता पार्टी तर्फे सातारा विधानसभा निवडणूक प्रमुख अविनाश कदम यांनी जिल्हाधिकारी तथा सातारा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे केली

सातारा विधानसभेमध्ये २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी एकूण ४४५ मतदान केंद्र अस्तित्वात होती. एकूण मतदार ३३५७५१ इतके होते, त्यापैकी २१०६५८ इतक्या मतदारांनी मतदान केले.

लोकसभा निवडणुकीच्या मतदानावेळी अनेक मतदारांच्याकडे मतदान कार्ड असूनही आणि २०१९ च्या लोकसभा आणि विधानसभा या दोन्ही निवडणुकीमध्ये मतदान करूनही २०२४ च्या मतदार यादी मध्ये त्यांचे नाव नसल्याने त्यांना मतदान करता आले नाही, अनेक मतदान केंद्रावर किमान दहा ते पंधरा मतदार वरील कारणामुळे मतदानापासून वंचित राहिले, एकाच कुटुंबातील नावे वेगवेगळ्या मतदान केंद्रावर विभागली गेलेली होती, एकाच वस्तीतील एकाच सोसायटीतील नावे वेगवेगळ्या मतदान केंद्रांवर होती, त्यामुळे एका मतदान केंद्रावर नावे न सापडल्याने अनेक जणांचे मतदान झाले नाही आणि मतदानाची टक्केवारी कमी झाली.

या सर्व गोष्टींचा विचार करून एका मतदान केंद्रावरील मतदारांची संख्या ६५० ते ७०० च्या आत असावी, ज्या ठिकाणी मतदारांची संख्या ७०० पेक्षा जास्त आहे त्या मतदान केंद्राची विभागणी करून त्याला अ आणि ब अशी नावे द्यावीत अशी मागणी करण्यात आली

एकाच वस्तीतील एकाच सोसायटीतील नावे एकाच मतदान केंद्रावर असावीत, त्याचप्रमाणे एकाच कुटुंबातील नावे एकाच बुथवर लागोपाठ असावीत, मतदार यादी तयार करताना सोसायटीतील घर नंबर प्रमाणे आणि वस्तीतील घर नंबर प्रमाणे करावी जेणेकरून बी एल ओ यांना देखील मतदारांची पूर्ण माहिती घेणे सोपे होईल, मयत मतदारांची नावे, दुबार मतदारांची नावे यांची योग्य पडताळणी करून ती नावे कमी करावीत याबाबतही निवेदन देण्यात आले

वरील उपाय योजना करून मतदार यादीतील त्रुटी दुरुस्त कराव्यात आणि यापुढे ज्या निवडणुका होतील त्यामध्ये मतदान टक्केवारी वाढण्यासाठी प्रयत्न करावेत असे निवेदनात नमूद करण्यात आले असून माननीय जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आणि लवकरच याबाबत बैठक घेऊन कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले

यावेळी भाजपा सातारा विधानसभा निवडणूक प्रमुख अविनाश कदम, भाजपा सातारा शहराध्यक्ष विकास गोसावी जिल्हा सरचिटणीस विठ्ठल बलशेटवार, जिल्हा उपाध्यक्ष राहुल शिवनामे, कायदा आघाडी जिल्हाध्यक्ष ड सचिन तिरोडकर, जिल्हा संवादक प्रवीण शहाणे, सातारा शहर सरचिटणीस विक्रांत भोसले, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष विक्रम बोराटे, सातारा विधानसभा विस्तारक अविनाश खर्शीकर, सातारा तालुका पश्चिम मंडल अध्यक्ष महेश गाडे, जावळी तालुका अध्यक्ष श्रीहरी गोळे आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# उंचगावात जादा परताव्याच्या आमिषाने सव्वा कोटीला गंडा

**कोल्हापूर :** शेअर मार्केटमध्ये अमाप पैसे कमावल्याची बतावणी करून ज्यादा परताव्याचे अमिष दाखवत सव्वा कोटी रुपयांना गंडा घालणाऱ्यां सहा जणांवर गांधीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून यापैकी चौघा जणांना अटक करण्यात आली आहे.

आरोपींची नावे अशी आकाश शिवाजी कांबळे, सुभाष शिवाजी कांबळे, शिवाजी पांडुरंग कांबळे (सर्व रा.वाकरे ता.करवीर जी. कोल्हापूर) सयाजी जिन्नाप्पा भोसले,रोहन जिन्नाप्पा भोसले,शिवाजी जिंन्नाप्पा भोसले,तिघे (रा.वळिवडे ता.करवीर.) यापैकी, आकाश शिवाजी कांबळे,शिवाजी पांडुरंग कांबळे .फरार झाली आहेत.अन्य चौघांना अटक केली आहे.

फॉरेक्स शेअर मार्केट ट्रेनिंग,करत असल्याचे सांगत उंचगाव ता करवीर येथील, ब्राईट बूल ट्रेडिंग अँड,इन्व्हेस्टमेंट प्रा.लि.कंपनीमध्ये काही जणांना ट्रेनिंग दिले. शेअर मार्केटच्या माध्यमातून या सहा जणांनी भरपूर पैसे कमावल्याचे ट्रेनिंग साठी आलेल्या लोकांना सांगितले. ही बतावणी करताना महागड्या गाड्या,ब्रँडेड कपडे,परदेशात जाणे येणे,असा दिखावा करून ट्रेनिंगला आलेल्या लोकांना समोहित केले.

## पोलीस भरती' तील मैदानी चाचणी पूर्ण

**कोल्हापूर :** शुक्रवारी जिल्ह्यातील पोलीस भरती प्रक्रिया २०२२-२३ ची पोलीस भरतीसाठी आलेल्या सर्व उमेदवारांची मैदानी चाचणी प्रक्रिया पूर्ण झाली. मैदानी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मैदानावरच कोल्हापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी पोलीस भरती प्रक्रिये दरम्यान कर्तव्य बजावलेल्या अधिकारी व कर्मचारयांना प्रशस्ती पत्र देउन गौरविण्यात आले.

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक, सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक व इतर पोलीस अधिकारी तसेच सर्व अंमलदार, अंशकालीन कर्मचारी अशा सर्वांना मैदानावरच प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर सर्व अधिकारी व कर्मचारी हे त्यांच्या पूर्ववत कर्तव्यावर रवाना झाले.

शुक्रवारी पोलीस शिपाई पदाच्या मैदानी चाचणीसाठी दि. १९ ते दि.२३ या कालावधी मधील २१ उमेदवार आले होते. यापैकी १७ उमेदवार पात्र ठरले. तर चालक पोलीस शिपाई पदाच्या मैदानी चाचणीसाठी दि. २४ ते दि. २७ जून या कालावधी मधील ३२ उमेदवार भरती प्रक्रीयेमध्ये सहभागी झाले. यामध्ये २७ उमेदवार पात्र ठरले.

# लोकसभा निवडणुकीनंतर वीजदरवाढीचा ग्राहकांना शॉक

**पाटण :-** राज्यातील लोकसभा निवडणुकी नंतर सरकारने वीजदरात मोठी वाढ करून आगोदरच महागाईने हैराण झालेल्या वीज ग्राहकांना मोठा शॉक दिला आहे.




महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नवीन विजदर वाढीनुसार ग्राहकांच्यावर भुर्दंड बसविला असून आयोगाच्या नवीन वीज दरवाढ मंजुरी नुसार दि. १ एप्रिल २०२४ पासून वीज दरात वाढ झाली आहे. त्यामध्ये पुन्हा अतिरिक्त सुरक्षा ठेव आणि वाढीव इंधन अधिभाराचा बडगा उगारला आहे. यामध्ये ग्राहकांना वीजदरात छुपी दरवाढ करुन दुहेरी झटका दिला आहे. यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विरोधात ग्राहकांतून तीव्र संताप व्यक्त होत असतानाच या विजदर वाढीचा दुसरा झटका पुढे होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र सरकार ला बसणार असल्याच्या भावना नागरिक बोलून दाखवीत आहेत.

१ एप्रिल पूर्वी सरासरी वीज वापराच्या एक महिन्याच्या रकमेइतकी सुरक्षा ठेव बंधनकारक होती. आता मात्र नवीन नियमाप्रमाणे ही सुरक्षा ठेव दोन महिन्याच्या बिला इतकी घेतली जात आहे. मार्च अखेरीस प्रत्येक ग्राहकाच्या वार्षिक वीज वापराचे अवलोकन केले जाणार असून वाढीव वापरानुसार कमी पडणारी रक्कम अतिरिक्त सुरक्षा ठेव म्हणून घेतली जाणार आहे. एकाच वेळी दरवाढ, इंधन अधिभाराची आकारणी व अतिरिक्त सुरक्षा ठेव यामुळे वीज दरवाढीचा शॉक सर्वसामान्य लोकांना बसला आहे. वीज दरवाढीचा फटका घरगुती ग्राहकांसोबत उद्योग, कृषी आदी संवर्गातील वापरकर्त्यांना देखील बसला आहे.

जीवनावश्यक वस्तूंच्या भरमसाठ वाढीमुळे नागरिक आधील हवालदिल झाले असताना महावितरणकडून स्थिर आकार, वहन आकार, इंधन समायोजन आकार, सुरक्षा ठेव, वाढीव इंधन अधिभार आदी शुल्क वसूल करून नागरिकांची लुट सुरु केली आहे. शेजारील इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रातच विजेचे दर महावितरणने भरमसाठ लावले असून या नेहमी होणाऱ्या दरवाढीचा झटका दोन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणूकीत राज्यकर्त्यांना बसणार असल्याचे मत सर्वसामान्य वीज ग्राहक बोलून दाखवीत आहेत. शासनाने यामध्ये तातडीने लक्ष घालून विजेचे दर कमी करावेत अन्यथा आम्ही तूमची जागा कमी करु अशा संतप्त भावना वीजग्राहक नागरिक व्यक्त करीत आहेत.

# साताऱ्यातही आता हृदय आणि फुफुस प्रत्यारोपण बाह्य सुविधा उपलब्ध होणार : डॉ. राहुल केंद्रे

## पुण्यातील डीपीयू सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलची सुविधा

**सातारा :** हृदय आणि फुफ्फुसाच्या अति गंभीर आजारांच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी यांच्यावतीने साताऱ्यातील हार्टलाइन डायग्नोस्टिक प्रायव्हेट लिमिटेड उत्तेकरनगर व प्रतिभा हॉस्पिटल सातारा येथे बाह्य रुग्ण विभाग सुरू होत आहे. या सुविधेमुळे हृदय व फुफ्फुसासंबंधित रुग्णांना तज्ञांचे समुपदेशन व मार्गदर्शन मिळणे शक्य होणार आहे तसेच प्रत्यारोपण शस्त्रक्रिया बाह्य रुग्ण उपचार साताऱ्यात उपलब्ध होणार असल्याची माहिती फुफ्फुस प्रत्यारोपण व श्वसन विकार तज्ञ डॉ. राहुल केंद्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी डीपीयू जनरल मॅनेजर दीपक पाटील, प्रतिभा हॉस्पिटलचे डॉ. संजय साठे, डॉ. समीर चव्हाण तसेच प्रत्यक्ष शस्त्रक्रिया झालेल्या माजी प्राचार्य सुजाता पवार यावेळी उपस्थित होते

या सुविधेची माहिती देताना डॉ. केंद्रे म्हणाले फुफ्फुसंबंधी दुर्धर बऱ्या होऊ न शकणाऱ्या कोविडमुळे लंग फायब्रोसिस झालेल्या रुग्णांना अंथरुणावर खिळून राहावे लागते.

त्यामुळे अशा रुग्णांना वेळ आणि खर्च यांची बचत करण्यासाठी पुण्यातील डीपीयू सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलने हार्टलाइन डायग्नोस्टिक प्रायव्हेट लिमिटेड उत्तेकर नगर (अध्यक्ष डॉक्टर रमेश चौगुले ) आणि प्रतिभा हॉस्पिटल, सातारा जिल्हा परिषद जवळ हृदयरोग तज्ञ (डॉ. सोमनाथ साबळे व श्वसन विकार तज्ञ संजय साठे) या हॉस्पिटलमध्ये बाह्य रुग्ण विभाग सुरू होत आहे.




पत्रकार परिषदेमध्ये माहिती देताना डॉ. राहुल केंद्रे शेजारी दीपक पाटील, डॉ. संजय साठे, डॉ. समीर चव्हाण तसेच सुजाता पवार.

साताऱ्यातील विशेषतः ग्रामीण भागातील रुग्णांना याचा फायदा होणार आहे. ऑक्सिजनवर अवलंबून अथवा अति गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना काही वेळा अवयव प्रत्यारोपण सुद्धा करावे लागतात. या रुग्णांना हैदराबाद चेन्नई येथे जाऊन उपचार घ्यावे लागतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर खर्च होतो, आता पुण्यातील डीपी हॉस्पिटलमध्ये या प्रत्यारोपणाच्या सर्व सेवा सुविधा अनुभवी कुशल डॉक्टर टीम उपलब्ध होणार असून सातारा परिसरातील रुग्णांना या सुविधेचा लाभ होणार आहे.

५४ वर्षाच्या माजी प्राचार्या साताऱ्याच्या सुजाता पवार यांनी त्यांचा स्वतःचा अनुभव कथन केला. त्या म्हणाल्या, डीपीओ सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल पिंपरी येथील वैद्यकीय उपचार आणि त्यातील तज्ञ डॉक्टरांच्या उपचारामुळे माझी फुफ्फुस प्रत्यारोपणाची गुंतागुंतीची प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. यामुळे मला जणू पुनर्जन्मच मिळाला आहे. डीपीयू हॉस्पिटलच्या बाह्य विभागाची माहिती आणि या सेवेचा लाभ हृदय व खूपच विकाराने त्रस्त रुग्णांनी अवश्य घ्यावा असे आवाहन डीपी सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल तर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९७६६७८३१५३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


# अन्नपुरवठा निरीक्षक पदी निखिल गिरमकर यांची निवड

**देऊळगाव राजे :** येथील निखिल लालासाहेब गिरमकर याची नुकतीच महाराष्ट्र शासनाच्या अन्नपुरवठा निरीक्षक पदी निवड झाली आहे, निखिलचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा देऊळगाव या ठिकाणी झाले तर माध्यमिक शिक्षण देऊळगाव राजे येथील सिद्धेश्वर विद्यालयात झाले. अकरावी बारावीचे शिक्षण टीसी कॉलेज बारामती येथे झाले तर बीएससी ॲग्री डी वाय पाटील कॉलेज तळेगाव दाभाडे या ठिकाणी झाले. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास पुणे या ठिकाणी केला पदीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर



,२०१९ पासून एमपीएससी ची तयारी चालू केली जून २०२४ मध्ये अन्नपुरवठा निरीक्षक या पदावर निवड झाली असून अजून पुढील पदासाठी पुणे येथे तयारी चालू आहे. दरम्यानच्या काळात लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या कृषी अधिकारी पदाच्या दोन मुख्य परीक्षा दिल्या२०२३ मध्ये एमपीएससी एमपीएससी तर्फे घेण्यात येणारे फूड सेफ्टी ऑफिसर मुख्य परीक्षा दिली आहे बँकेत असणारी कृषी अधिकारी या पदासाठी दोन वेळा मुलाखत दिली होती, या सर्व परीक्षा देत असताना महाराष्ट्र शासनाच्या अन्नपुरवठा निरीक्षक पदावर निखिल ची निवड झाली आहे. निखिल चे वडील लालासाहेब गिरमकर हे प्रगतशील शेतकरी असून देऊळगाव राजे विकास सोसायटीचे माजी चेअरमन आहेत तर आई गृहिणी आहे सदर निवडीने निखिलचे परिसरातून अभिनंदन होत आहे.

# गावठी दारु भट्ट्यावर पोलीसांची कारवाई



**कोल्हापूर :** राजारामपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मोरेवाडी कंजारभाट वसाहत येथे अवैध गावठी दारु भट्ट्यावर राजारामपुरी पोलीस ठाणे गुन्हे शोध पथकाने कारवाई केली. या कारवाईतून ५४ हजार १०० रू पये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

यावेळी प्रकाश जॅकसन बागडे, रोहित प्रकाश माटुंगे, चरण बिरसिंग बागडे सर्व रा. कंजारभाट वसाहत, मोरेवाडी, ता. करवीर यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला. कंजारभाट वसाहत, मोरेवाडी येथे अवैध गावठी हातभट्टी दारु निर्मिती होत असल्याची माहिती मिळाल्याने राजारामपुरी पोलीसांना मिळाली. यावेळी पोलीस निरीक्षक अनिल तनपुरे तसेच कर्मचारयांनी वैध गावठी हातभट्टी दारु निर्मिती करणारयांवर कारवाई केली.

# सुजल सरनायक याची मर्चंट नेव्हीमध्ये नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार

**हिंगोली:-**शहरालगत असलेल्या नगरात येथील संत नामदेव नगरातील पत्रकार गोपालराव सरनायक सवनेकर यांच्या लहान मुलगा चि.सुजल सरनायक याची मर्चंट नेव्ही मध्ये नियुक्ती झाल्याबद्दल बळसोंड येथील पप्पुभाऊ चव्हाण मित्र मंडळ चे वतीने सत्कार करण्यात आला.

बळसोंड येथील संत नामदेव नगरातील सुजल गोपालराव सरनायक याने समुंद्रा इन्स्टिट्यूट ऑफ म्यारिटाईम स्टडीज, लोणावळा मधे उछ्ड (डिप्लोमा इन् नौटिकल सायन्स) करून मर्चंट नेव्ही मध्ये डेकॅकडेट हि पदवी मिळाली आहे याबद्दल



हिंगोली जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तथा बळसोंड ग्रामपंचायत उपसरपंच प्रतिनिधी पप्पुभाऊ चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य सुमित धिके यांच्या हस्ते हार, पेढा घालून वृक्ष देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी विशाल जिरवणकर, राजेश मोकाटे,ग्रामपंचायत चे माजी सदस्य रामभाऊ ठमके,पत्रकार गोपालराव सरनायक, विष्णु ठाकरे, किरण घंटे, ऋषिकेश पोले, राजेश नायक, रमण उपाध्याय, गोपाल पवार आदींची उपस्थिती होती.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# दिव्यांगांचा प्रेरणेचा प्रवास पुढे यावा : डॉ. श्रीकांत केळकर

पुणे : आडकर फाउंडेशनतर्फे दिला जाणारा 'डॉ. हेलन केअर स्मृती पुरस्कार' दृष्टीहीनतेवर मात करून स्वतःच्या पायावर उभ्या असलेल्या रीना पाटील यांना ज्येष्ठ नेत्र तज्ञ तसेच नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ऑफ्थेल्मॉलॉजीचे संस्थापक डॉ. श्रीकांत केळकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. दिवंगत दृष्टिहीन सामाजिक कार्यकर्त्या डॉ. हेलन केलर यांच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. पुरस्काराचे वितरण गुरुवारी (दि. २७) सकाळी अकरा वाजता नवी पेठेतील पत्रकार




भवन येथे झाले. नॅशनल फेडरेशन ऑफ ब्लाइंडचे राष्ट्रीय सल्लागार दिलीप शेलवंते , सौ. मैथिली आडकर , सौ. अरुणा केळकर उपस्थित होते. प्रमोद आडकर यांनी प्रास्ताविकात फाऊंडेशनच्या कार्याची माहिती दिली. निरुपमा महाजन यांनी सूत्रसंचालन केले.


डॉ. श्रीकांत केळकर म्हणाले,' प्रेरणादायी व्यक्तीचा प्रवास सर्वांपर्यंत आणण्याचे काम प्रेरणादायी आहे. आडकर फाऊंडेशनचे हे काम प्रोत्साहनात्मक आहे. संकटांना घाबरता पुढे जात राहिले पाहिजे. दृष्टीहीन व्यक्तींना समाजाने साथ देत राहिले पाहिजे. प्रेरणेचा प्रवास सातत्याने प्रगतीकडे जात राहिला पाहिजे.

मनोगत व्यक्त करताना रिना पाटील म्हणाल्या, ' दृष्टीहीन व्यक्तींनी सहानुभूती मिळवत बसू नये. डोळे नाहित तरी इतर अवयव कार्यरत आहेत , या जिद्दीने काम करावे. समाजाने देखील इतर व्यक्तींप्रमाणे दृष्टीहीन , दिव्यांग व्यक्तींना वागवले पाहिजे . मनातील दुःख बाजूला ठेऊन हसऱ्या चेहऱ्याने वावरले पाहिजे'. दिलीप शिलवंते म्हणाले , ' हष्टीहीन व्यक्तींसाठी समाधानकारक असले तरी पुरेसे नाही, हे काम वाढले पाहिजे.

# संत ज्ञानेश्वर महाराजांचा प्रस्थान सोहळा संपन्न

**आळंदी(पुणे) :** संत ज्ञानेश्वर महाराजांचा आषाढी पायीवारी सोहळा शनिवारी (दि. २९) आळंदीतूनपंढरपूरकडेप्रस्थान करणार आहे. देऊळवाड्यात प्रस्थान सोहळा सुरू आहे. दरम्यान प्रस्थान सोहळादिनी आळंदीत दिवसभर माऊली नामाचा गजर सुरू होता. परिणामी अलंकापुरी भक्तिरसात न्हाऊन निघाली. तत्पूर्वी शुक्रवारी (दि. २८) देहूनगरीतून तुकोबांच्या पालखीचे प्रस्थान करून अनेक भाविक आळंदीत माऊलींच्या प्रस्थान सोहळ्यासाठी दाखल झाले होते. यंदा सुमारे साडेतीन लाखांहून अधिक भाविकांनी प्रस्थान सोहळ्यानिमित्त आळंदीत उपस्थिती लावली. आषाढाची चाहूल लागताच वारकऱ्यांना पंढरीच्या वारीची ओढ लागते. त्यामुळे पायीवारीत सहभागी होण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविकांची मांदियाळी आळंदीत दाखल झाली आहे. शुक्रवारी (दि.२८) सायंकाळी अनेक वारकरी दिंड्यांसह आळंदीत दाखल झाले. परिणामी आळंदी भाविकांनी गजबजून निघाली आहे. आळंदीत दाखल होताच प्रथमदर्शी भाविक माऊलींच्या दर्शनासाठी रांगेत उभे राहत आहेत. सद्यस्थितीत दर्शनरांग इंद्रायणी पलीकडे जाऊन पोहचली आहे. प्रस्थान सोहळ्यानंतर आजोळघरात अनेकांनी रांगेतून दर्शन घेतले.

वाढती गर्दी लक्षात घेऊन शुक्रवारपासून (दि.२८) महाद्वारातून वारकरी तसेच भाविकांना प्रवेश बंद केला होता. दरम्यान प्रस्थान सोहळ्याच्या पूर्वसंध्येला टेम्पो, ट्रकमधून वारकरी भाविकांचे आगमन झाले. तर काही वारकरी पायी चालत आळंदीत दाखल झाले आहेत.



भाविकांच्या आगमनाने इंद्रायणी नदीतीर गजबजून निघाला आहे. इंद्रायणी तीरावर वासुदेवाच्या हरीनामाचा गजर ऐकू येत आहे. तर काही भाविक वारीची आठवण जतन करण्यासाठी इंद्रायणी नदीकाठावर आपल्या कुटंबियांसमवेत मोबाईलमध्ये छायाचित्रण करत असताना दिसून येत होते.

पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त आळंदी शहरात अनेक हार प्रसाद फुलांची व वारकरी साहित्य वस्तूंची दुकाने सजली असून मंदिरामधील दर्शनबारीत वारकरी भाविक 'ज्ञानोबा माऊलीचा' जयघोष करत आहेत. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधीचे दर्शन घेऊन मंदिरामध्ये क्षणभर विसवून हरीनामाचा जप करताना दिसत होते. अनेकांनी महाद्वाराबाहेर राहून प्रस्थान सोहळा अनुभला.

**माऊलींची महापूजा...**

माउलींच्या आषाढी पायीवारी प्रस्थान प्रसंगी पवमान अभिषेक, ११ ब्रम्हवृन्दांचा वेदघोष, समाधीवर माऊलींच्या मुखवट्याला दुध, मध व दह्याचा अभिषेक करण्यात आला. नंतर गरम पाण्याने 'श्रीं'ना स्नान घालण्यात आले. सुवासिक चंदन, अत्तर लावून माऊलींची सर्वांगसुंदर पूजा बांधून मुखवट्यावर पोशाख परिधान करण्यात आला. या विधिवत पूजासमयी माऊलींचे 'साजिरे' रूप आकर्षक दिसून येत होते.

आषाढी पायीवारी प्रस्थान सोहळ्यासाठी मुख्य महाद्वारातून मानाच्या ४७ दिंड्याना मंदिरात प्रवेश दिल्यानंतर टाळ - मृदुंगाचा निनाद व 'ज्ञानोबा तुकारामां'चा जयघोष अंगावर शहारे उमटवीत होता. फेर, फुगडी, मनोऱ्यामधून मनसोक्त बेभान होऊन वारकरी नाचत होते. याप्रसंगी मंदिरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**पुण्यात दुसरा मुक्काम...**

आजोळघरात रविवारी (दि.३०) पहाटे साडेपाच वाजता परंपरेनुसार शितोळे सरकारांचा माउलींच्या पालखीला नैवद्य दाखविला जाईल. सहाच्या दरम्यान शितोळे सरकारांचे अश्व अजोळघरी आणून त्यांना मानपान देण्यात येईल. त्यानंतर माउलींची पालखी आळंदी ग्रामस्थ व मानकऱ्याच्या खांद्यावर घेऊन नगरपालिकेसमोर सजविलेल्या रथात विराजमान करण्यात येईल. तद्नंतर वाजत - गाजत हा पालखी सोहळा पुढे धाकट्या पादुका व नंतर साईमंदिरासमोर थोरल्या पादुकांशेजारी जाऊन विसावा घेईल. थोरल्या पादुका मंदिरात अध्यक्ष ॲड. विष्णू तापकीर यांच्या हस्ते आरती करण्यात येईल. आरतीनंतर साडेनऊच्या सुमारास पालखी पुण्याकडे मार्गस्थ होईल.

# कश्यपी धरणग्रस्तांचा वाद थांबला

नाशिक- कश्यपी धरणातून गंगापूर धरणासाठी विसर्ग करण्यासाठी जलसंपदा विभागाने मध्यस्थी केल्यामुळे अखेरीस या धरणामध्ये ५०० क्युसेक्स वेगाने पाणी विसर्ग सुरू झाला आहे.-

ढगंगापूर धरणातील साठा अवघा सतरा टक्के इतका झाला असून याच धरणाचे साठवण धरण म्हणून बांधण्यात आलेल्या कश्यपी धरणातून पाण्याचा विसर्ग करून तो गंगापूर धरणात पाणी आणण्यात येत आहे.गेल्या सोमवारी ५०० क्युसेक्स वेगाने पाणी पाण्याचा विसर्ग केला जात असताना कश्यपी ग्रामस्थांनी त्यांच्या विविध वागण्यासाठी आंदोलन केले आणि पाणी विसर्ग रोखण्याची मागणी केली. दरम्यान,जलसंपदा विभागाने पाण्याचा विसर्ग थांबवला नसला तरी ५०० ऐवजी २२५ क्युसेक्स वेगाने पाणी सोडण्यास प्रारंभ केला त्यामुळे पाण्याचा तांत्रिक लॉस देखील वाढणार होता.

दरम्यान जिल्हाधिकारी जलाज शर्मा यांच्याकडे प्रकल्पग्रस्तांची बैठक झाली त्यांनी मागण्या मान्य केल्यानंतर अखेरीस गंगापूर साठी पाणी सोडण्यास कश्यपीचे ग्रामस्थ तयार झाले त्यानंतर आता पुन्हा ५०० क्युसेक्स वेगाने पाणी विसर्ग आज पासून सुरू झाला आहे.

# रेकॉर्डवरील गुंडाकडून इचलकरंजीतील शहापुरात चौघांना अमानुष मारहाण

**कोल्हापूर :** इचलकरंजीतील शहापूर येथे डुकराला मारल्याच्या कारणावरून रेकॉर्डवरील गुंडाने चार जणांना लोखंडी पाईपने अमानुष मारहाण करण्यात केलीय, तिमन्ना प्रकाश वडर, रोहित चद्रकांत वडर रोहित उमेश वडर (सर्व रा. नवीन नगरपालिका, जयभीमनगर, इचलकरंजी) अशी जखमींची नावे आहेत, पाईपने मारहाण करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला, घडलेल्या घटनेची माहिती पोलिसांना दिल्यास घरात येऊन गोळ्या घालीन व महिन्याला मला पैसे द्यावे लागतील, अशी खंडणी मागितल्याप्रकरणी शाम लाखे, त्याचे वडील, आदर्श ऊर्फ आद्या, माया, सुरज व इतर दोन अनोळखी (रा. दत्तनगर शहापूर) यांच्या विरोधात शहापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबतची फिर्याद रावसाहेब प्रकाश वडर याने दिली आहे.

घडलेल्या प्रकाराचा व्हिडीओ व्हायरल झाल्यामुळे इचलकरंजी परिसरात खळबळ उडाली आहे.

रविवारी रात्री नऊच्या सुमारास रावसाहेब वडर आणि त्याचे मित्र चालत येत असताना शहापूर येथील वर्धमान चौक गल्लीतील डुक्कर त्यांच्या अंगावर चावण्यासाठी धावून आले, म्हणून त्यांनी त्याच्या दिशेने दगड मारले असता त्यातील एका डुकराचा मृत्यू झाला. तेथे असलेले त्यांच्या ओळखीचे संशयित आरोपी यांनी रावसाहेब वडरसह त्याच्या साथीदारांना मारहाण करून गाडीवर जबरदस्तीने बसवून श्याम लाखे याच्या दत्तनगर शहापूर येथे

घरी आणले. शिवीगाळ करीत रावसाहेब वडर याचे हात व पाय धरून शाम लाखे याने लोखंडी पाईप घेऊन शिवीगाळ करीत डुकराला का मारलेस, मी कोण आहे माहीत नाही का, असे म्हणत त्यांच्या मानेवर पाय ठेवून दोन्ही मांड्यांवर, दोन्ही हातावर तसेच पायांच्या तळव्यांवर लोखंडी पाईपने मारहाण केली. पुन्हा वर्धमान चौकात दिसायचे नाही, जर दिसला तर तुम्हाला जिवंत ठेवणार नाही. तसेच या प्रकाराबाबत पोलिस केस केली, तर तुमच्या घरात येऊन गोळ्या घालीन, अशी धमकी दिली. आता मला दर महिन्याला पैसे द्यावे लागतील, असे म्हणून रावसाहेबजवळ असलेले ३ हजार रुपये देण्यास भाग पाडले, असेही पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

इचलकरंजीतील शहापूर जवळील दत्तनगरच्या गल्ली नंबर चार मध्ये रेकॉर्डवरील गुन्हेगाराकडून चौघांना पाईपने बेदम मारहाण केल्याची घटना घडली असून याबाबतचा व्हिडिओ ही पोलिसांना मिळाला आहे, फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्यांचा शोध घेत आहे.

# पाटण रोटरी क्लबच्यावतीने गरजू महिलांना आटा चक्की वितरण

**पाटण :** -सामाजिक सेवेचं व्रत हाती घेऊन रोटरी क्लबची स्थापना झाली. पाटण सारख्या ग्रामीण व छोट्या तालुक्यातूनही मोठ्या प्रमाणावर सामाजिक योगदान देण्याचे भाग्य आम्हा रोटरीवासीयांना मिळालं यासारखं भाग्य नाही. यात रोटरीच्या वरिष्ठ पातळीवरूनही वेळोवेळी मिळणारी सामाजिक मदत आमचं सामाजिक, मानसिक बळ वाढवते असे प्रतिपादन कोयना एज्युकेशन सोसायटीचे सचिव तथा रोटरीयन अमरसिंह पाटणकर यांनी केले .

रोटरी क्लब पाटणच्या वतीने गरजू, गरीब व होतकरू महिलांनाआटा चक्की वाटप कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी रोटरीचे सह प्रांतपाल गजानन माने, रोटरी क्लब पाटणच्या च्या अध्यक्षा डॉ. सौ. विद्या पाटील , सेक्रेटरी जयदीप फुटाणे, नूतन अध्यक्ष संजीव चव्हाण, सेक्रेटरी सौ. शिलादेवी पाटणकर, रोटरी क्लब पाटणचे पदाधिकारी, सदस्य यांनी तसेच रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर स्वाती हेरकल आदी मान्यवर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.



**रोटरी क्लब पाटणच्या वतीने गरीब, होतकरू महिलांना आटा चक्की वितरण करताना अमरसिंह पाटणकर, गजानन माने, डॉ सौ विद्या पाटील आदी मान्यवर.**

# पवित्र इंद्रायणीचे पाणी आणि नदी घाट स्वच्छ ठेवा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**आळंदी :** आषाढी वारीसाठी आळंदी येथे राज्यभरातून लाखो भाविक येत असतात आणि श्रद्धेने, भक्तिभावाने पवित्र इंद्रायणी नदीत स्नान करतात. प्रशासनाने याची दखल घेऊन पवित्र इंद्रायणीचे पाणी आणि नदी घाट स्वच्छ ठेवावा, असे निर्देश मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांनी दिले.

आळंदीत मुख्यमंत्री शिंदे यांनी शनिवारी (दि.२९) श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज प्रस्थान सोहळ्यात सहभाग घेत समाधीचे दर्शन घेऊन इंद्रायणी नदी घाट परिसरातील स्वच्छतेची पाहणी केली. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, विभागीयआयुक्तडॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चोबे, आळंदी नगरपालिकेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांच्यासह इतर विभागातील अधिकारी उपस्थित होते.मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेम्हणाले, पिंपरी चिंचवड औद्यगिक



परिसरातील कंपन्याचे दूषित पाणी इंद्रायणी नदीत येणार नाही याची दक्षता घ्यावी. श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज समाधीचे दर्शन घेण्यासाठी आषाढी वारी सोहळा, कार्तिक एकादशी या दिवशी लाखो संख्येने भाविक येत असतात. याव्यतिरिक्त वर्षभर भाविकांची मांदियाळी येथे सुरू असते. नदीचे महत्व आणि पावित्र्य लक्षात घेऊन इंद्रायणी नदीचा घाट आणि पाणी वर्षभर स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी. प्रशासनाने भाविकांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

# पर्यटकांना ताम्हिणी अभयारण्यात प्रवेश बंदी!

**पुणे:** पावसाळ्यात अपघात वाढत असल्याने वन विभागाचा निर्णयपुणे:सध्या पावसाळा सुरू झाल्याने पर्यटनासाठी नागरिक घराबाहेर पडत आहेत. वर्षा पर्यटनासाठी अनेकजण ताम्हिणी वन्यजीव अभयारण्यात जातात. परंतु, हे क्षेत्र अपघातप्रवण असल्याने या ठिकाणी पर्यटकांना ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत प्रवेश बंदी घालण्यात आली आहे, अशी माहिती उपवनसंरक्षक (वन्यजीव) तूषार चव्हाण यांनी दिली आहे.

ताम्हिणी वन्यजीव अभयारण्यातील प्लस व्हॅलीमध्ये पावसामुळे निसरड्या झालेल्या वाटांवर होणाऱ्या अपघाताचा धोका लक्षात घेऊन वन्यजीव विभागामार्फत निसर्गवाटा २८ जून २०२४ ते ३० जून २०२४ पर्यंत पर्यटनासाठी बंद करण्यात आल्या आहेत. ताम्हिणी परिसरात वर्षा ऋतूमधील आल्हाददायक परिसर व धबधब्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची गर्दी मोठ्या प्रमाणावर होते. प्लस व्हॅलीतील मिल्की बार सारख्या धबधब्यातील कुंडामध्ये पाण्याच्या प्रवाहाचा व खोलीचा अंदाज न आल्याने अपघाताचे प्रमाण वाढल्याची शक्यता आहे. म्हणून ताम्हिणी वन्यजीव अभयारण्याच्या वतीने प्लस व्हॅलीमध्ये जाणाऱ्या सर्व पायवाटांचे प्रवेश प्रतिबंधित करण्यात आले आहेत.

# शिक्षक नियुक्तीचे पत्र हाती आले आणि डोळ्यांच्या कडा ओलावल्या



**कोल्हापूर :** शिक्षक नियुक्तीचे पत्र हाती आले आणि डोळ्यांच्या कडा ओलावल्या. याच क्षणी मोबाईलवर वडिलांचे निधन झाल्याचा संदेश आला. या घटनेने क्षेत्रात शिक्षकी क्षेत्रात पाऊल टाकणाऱ्या जुन्नर मधील तरुणाला गुरुवारी येथे जीवनातील वेगळ्याच प्रसंगाला सामोरे जावे लागले. सुखदुःखाचा अनोखा अनुभव त्यांनी आला.

माणसाचे विधीलिखित कसे असते कोणीच जाणू शकत नाही. सुखदुःखाच्या फेऱ्यामध्ये तो गुरफटलेला असतो. याच विलक्षण अनुभव आज हरिभाऊ दिगंबर विरणक या तरुणास आल. कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये शिक्षक म्हणून नियुक्ती झाली होती. आज भावी शिक्षकांसाठी समुपदेशन द्वारे पदस्थापनेची प्रक्रिया सुरू होती.

यावेळी हरिभाऊ यांना शिक्षकाच्या नोकरीचे नियुक्तीपत्र मिळाले. या आनंदायी प्रसंगाने ते भारावले. गेली अनेक वर्षे ज्याची प्रतीक्षा सुरू होती ते कार्य सफल झाल्याने डोळ्याच्या कढा नकळत ओलावल्या. चेहरा आनंदाने फुलला. पण तो आनंद क्षणकाळ टिकला. कारण दुसऱ्या क्षणी त्यांच्या मोबाईलवर वडिलांचे निधन झाल्याचे संदेश आला. हा आनंद पाहण्यासाठी वडील हवे होते याचे दुःख त्यांच्या अश्रूतून ओघळत राहिले.

ही माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेएन एस. यांना समजली. ते तात्काळ सभागृहाबाहेर आले. हरिभाऊंनी धीर दिला. त्यांच्या खांद्यावर मन टाकून हरिभाऊंनी अश्रुना वाट मोकळी करून दिली. कार्तिकेएन एस. यांनी स्वतःच्या गाडीपर्यंत हरिभाऊ यांना आणून जुन्नरला पाठवण्याची व्यवस्था करीत अधिकाऱ्यातील संवेदनशीलतेचे दर्शन घडविले.

# आषाढीसाठी विशेष अडीचशे बस, कोल्हापूर जिल्ह्यातील भाविकांसाठी महामंडळाची सुविधा

**कोल्हापूर :** आषाढी यात्रेनिमित्त एसटीच्या कोल्हापूर विभागाने भाविकांसाठी विशेष गाड्यांचे नियोजन केले आहे. जिल्ह्यातून २५० बस धावणार आहेत. कोणत्याही गावातून ४४ किंवा त्या पेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध होणार आहे, तसेच विविध घटकांना या बसमधून सवलतीत प्रवास करता येणार आहे.

या काळात राहणार सुविधा

लाखो भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या पंढरीच्या विठुरायाच्या भक्तांना आषाढी वारीसह विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनाचे वेध लागले आहेत. १३ जुलै ते २२ जुलै या कालावधीत आषाढी पंढरपूर यात्रा होत आहे. त्यासाठी विठुनामाचा जयघोष करत श्रीश्रेत्र पंढरपूरला जाणाऱ्या भाविक प्रवाशांसाठी एसटीने यात्रा काळात एसटीच्या १२ आगारांतून व्यवस्था केली आहे.

विविध सवलती

या प्रवासात ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकीट दरात सूट देणारी



महिला सन्मान योजनेचा लाभ घेता येणार आहे. त्यासह दिव्यांगासाठी असलेली सुविधा सुरू राहणार आहे.

आगारनिहाय धावणार बस

कोल्हापूर २५
संभाजीनगर २५
इचलकरंजी २५
गडहिंग्लज २३
गारगोटी २३
मलकापूर २३
चंदगड १८
कुरुंदवाड २३
कागल २३
राधानगरी २०
गगनबावडा ४
आजरा १८
एकूण २५०

तपासणी नाके

यात्रा काळामध्ये गर्दीचा फायदा घेऊन विनातिकीट प्रवास, वाहकाकडून तिकीट मागून न घेणे, अशाप्रकारे फुकट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लगाम घातला जाणार आहे. कोल्हापूरसह पंढरपूरला जाणाऱ्या विविध मार्गावर १२ ठिकाणी तपासणी नाके उभारले जाणार आहेत. त्यासाठी सुरक्षा कर्मचारी तैनात केले जाणार आहेत.

दरवर्षी श्रीश्रेत्र पंढरपूर येथे आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो भाविक प्रवासी येतात. अनेक प्रवासी स्वतःच्या खाजगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने किंवा विविध पालख्यांसोबत चालत दिंडीने येतात. या प्रवाशांना या वर्षीपासून गाव ते पंढरपूर अशी एसटीसेवा उपलब्ध असेल.

दरवर्षी आषाढी वारीसाठी प्रवाशांना एसटी विविध सवलती उपलब्ध करुन देत आहे. या वर्षीही थेट वारकऱ्यांच्या गावांतून एसटीची व्यवस्था केली आहे

# नटराज मंदिरात भजन मेळाव्यात मान्यवरांचा सत्कार संपन्न

**सातारा :** येथील श्री उत्तर चिदंबरम नटराज मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या २१व्या भजन मेळाव्यामध्ये मान्यवरांची उपस्थिती हा या कार्यक्रमाचा विशेष भाग असून या कार्यक्रमात या प्रमुख उपस्थित मान्यवर, सन्माननीय व्यक्तींचा शाल, श्रीफळ तसेच नटराज्याची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच या सोहळ्यास उपस्थित असलेल्या ३०० हून अधिक सुवासिनी महिलांना साड्यांचे वितरण करण्यात आले .या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक श्री गोपी भागवत यांनी या महोत्सवा अंतर्गत सुरू असलेल्या कार्यक्रमाची उपस्थित मान्यवरांना माहिती देताना सांगितले की, श्रीमद शंकराचार्य चंद्रशेखरेंद्र सरस्वती यांच्या आशीर्वादाने तसेच आयोध्या श्रीराम मंदिराचे उभारणीमध्ये विशेष सहभाग आणि मार्गदर्शन करणारे परमपूज्य जयेंद्र सरस्वती स्वामी महाराजांच्या



**साताऱ्यातील नटराज मंदिरात मान्यवरांना भजन मेळाव्यामध्ये शालीचे तसेच साड्यांचे वितरण करते प्रसंगी मान्यवर.**

आशीर्वादाने व सध्याचे कांचीपिठाचे प्रमुख शंकराचार्य श्रीमद स्वामी विजयेंद्र सरस्वती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा भजन मेळावा सातारा येथील भव्य अशा नटराज मंदिरात आयोजित करण्यात आला होता. याला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून सहकार्य केले तसेच सहभाग घेतला याबद्दल भजन समिती या सर्वांचे विशेष आभार मानत आहे.

याबद्दल मेळाव्यामध्ये उपस्थित असलेल्या सन्माननीय महोदयांचा समितीच्या वतीने शान श्रीफळ व श्री नटराज प्रतिमा देऊन तसेच महिला सुहासिनींना साडीचे वितरण करताना मला विशेष आनंद होत आहे या शाल व साडी वितरण कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हेमंतराव हरहरे, मुकुंदराव आफळे,.सुभाष दर्भे, एडवोकेट नितीन शिंगटे, महेश शिवदे, जयंत देशपांडे, आशिष शहाणे यांचेसह इस्कॉनचे प्रवीणप्रभू रसाळ, विजयराव गाढवे, अमेरिकेहून आलेले शंकर नारायणन, विश्व हिंदू परिषदेचे मान्यवर उपस्थित होते. वेदमूर्ती जगदीश शास्त्री भट मंदिराचे व्यवस्थापक श्री चंद्रशेखरन नारायणराव आदींच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

चेन्नई येथील भगवंत नाम प्रचार मंडळीच्या वतीने २१ वा वार्षिक भजन महोत्सव साताऱ्यात होत आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष व स्टेट बँक ऑफ इंडियाचे माजी सहाय्यक महाव्यवस्थापक गोपी भागवत, श्री उत्तर चिदंबरम नटराज मंदिर ट्रस्टचे व्यवस्थापकीय विश्वस्त रमेश शानभाग, वेदमूर्ती जगदीशशास्त्री भट, नारायण राव आदी उपस्थित होते. श्री कांची कामकोटी मुलम्यान सर्वज्ञ पीठम, कांचीपुरमचे प पू शंकराचार्य, श्री श्री श्री चंद्रशेखरेंद्र सरस्वती स्वामीजी, प पू श्री श्री श्री जयेंद्र सरस्वती स्वामीजी व विद्यमान पीठाधीश्वर प पू श्री श्री श्री शंकर विजयेंद्र सरस्वती स्वामीजी यांच्या कृपाशीर्वादाने हा मेळावा होत आहे. या मेळाव्यासाठी मंदिरात व मंदिराबाहेर पावसापासून संरक्षण होणारा भव्य सभामंडप उभारण्यात आला आहे. मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंदिरामधील सभामंडपामध्ये दररोज भजनसेवा होईल. मंदिराबाहेरील हॉलमध्ये अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. दररोज सकाळी अल्पोपहार, दुपारी व रात्री मोफत अन्नदान होईल. दरम्यान, या मेळाव्यात सकाळी सात ते दुपारी एक तसेच संध्याकाळी तीन ते रात्री साडेआठ या वेळेत जेष्ठ भागवतकरांकडून भजनसेवा होईल. दि. ३० जून रोजी श्री राधा कृष्ण कल्याणम (लग्न सोहळा) व प पू शंकराचार्य, श्री श्री श्री महास्वामी चंद्रशेखरेंद्र सरस्वती स्वामीजींच्या पादुकांना पुष्प लक्षार्चना नियोजित आहे. सर्व भाविक भक्तांनी या भजन मेळाव्यास उपस्थित राहून श्री शिवकामसुंदरी व आनंद नटराज आणि प पू शंकराचार्यांचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

३० जून रोजी या भजन मेळाव्यामध्ये वरील कार्यक्रम संपन्न होऊन या कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

# पर्यटनाची पंढरी ठोसेघर येथे पावसाळी पर्यटनाला प्रारंभ

## शनिवारपासून धबधबा पाहण्यासाठी गर्दी; व्यावसायिकांनी सोडला निश्वास

**सातारा:** संपूर्ण महाराष्ट्रात पर्यटनाची पंढरी समजल्या जाणाऱ्या ठोसेघर, ता. सातारा येथे शनिवार दि. २९ जून पासून पावसाळी पर्यटनाला प्रारंभ झाला असून शनिवारी धबधबा पाहण्यासह दाट धुके, पावसाच्या रिमझिम सरी याचा अनुभव घेण्यासाठी पर्यटकांनी फार मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. दरम्यान, पावसाळी पर्यटनाला प्रारंभ झाल्यामुळे धबधबा परिसरातील हॉटेल व खाद्य विक्रेते गाडी चालक व्यावसायिकांनी निश्वास सोडला आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात ठोसेघर येथील धबधब्यासह चाळकेवाडी पठाराला पर्यटनाची पंढरी समजली जाते. या ठिकाणी गठित करण्यात आलेल्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या मार्फत पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पेव्ह ब्लॉकचे रस्ते, पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी रेलिंग, ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी सिमेंटचे बाकडे, छोटा धबधबा पाहण्याकरिता जाण्यासाठी सिमेंटच्या पायऱ्या त्याच्याकडेला लोखंडी पाईपचे रेलिंग, पर्यटकांना पिण्यासाठी



मुबलक स्वच्छ पिण्याचे पाणी, न्याहरी केंद्र, स्वच्छतागृह, दुचाकी, चारचाकी वाहनांसाठी पार्किंग या व्यवस्था समितीने उपलब्ध करून दिल्या आहेत. गेल्या अकरा वर्षांमध्ये ठोसेघर धबधबा परिसराचा समितीने कायापालट केल्यामुळे महाराष्ट्रच नव्हे तर देश विदेशातून पावसाळी पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक येत असतात. प्रतिवर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यातच मान्सून हजेरी लावतो. यावर्षी मात्र सातारा जिल्ह्यात मान्सूनने उशिरा हजेरी लावल्यामुळे ठोसेघरकडे पर्यटक फिरकत नव्हते. आता मात्र परिस्थिती बदलली असून गेल्या चार दिवसांपासून ठोसेघर पठार परिसरात रिमझिम पावसाने सुरुवात केल्यामुळे अल्हाददायक वातावरण निर्माण झाले आहे. रिमझिम पावसामुळे ठोसेघर धबधबा प्रवाहित झाला असून खऱ्या अर्थाने शनिवारपासून तेथील पावसाळी पर्यटनाला प्रारंभ झाला आहे. शनिवारी खूप मोठ्या प्रमाणावर पर्यटकांनी धबधबा व परिसरातील प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. संयुक्त वन व्यवस्थापन समितीने आठ दिवसापूर्वीच पूर्ण व्यवस्था केल्यामुळे पर्यटकांनी समितीला धन्यवाद दिले.

**भुशी डॅमचा फिल**

ठोसेघर गावच्या उशाला जगमीन जलाशय बांधण्यात आला आहे. त्या जलाशयाच्या भिंतीची दुरुस्ती करायची होती. त्यासाठी सातारा पंचायत समितीचे माजी सदस्य शंकर आप्पा चव्हाण यांनी सातत्याने आ. श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे पाठपुरावा सुरू केला होता. तो करत असताना लोणावळा येथील भुशी डॅमच्या धर्तीवर जमीन जलाशयाच्या आउटलेट येथे सिमेंटच्या पायऱ्या बांधण्याचा प्रस्ताव त्यांनी शिवेंद्रसिंहराजे यांच्याकडे दिला होता. त्या प्रस्तावाची शिवेंद्रसिंहराजे यांनी तात्काळ दखल घेऊन त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला. गतवर्षी त्याचे काम पूर्ण झाले असून पावसाळ्यामध्ये त्या ठिकाणी भुशी डॅमचा फील येत आहे. हा जलाशय पाहण्यासाठी पर्यटक फार मोठ्या प्रमाणावर गर्दी करत आहेत.

**पावसाळ्यातील पठार तरुणाईला खुणावतेय**

धबधब्यापासून पुढे साधारण चार ते पाच किलोमीटर अंतरावर चाळकेवाडी पठार असून या पठारावर दिवसभर धुक्यामध्ये पावसाच्या रिमझिम सरी पडत असतात. या पठारावरून शिवसागर जलाशय, धुक्यामध्ये लुप्त झालेला वासोटा किल्ला पाहण्याचे सुख काही औरच असते. या ठिकाणी फोटो आणि सेल्फी काढण्यासाठी तसेच पावसात मनसोक्त भिजण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणावर गर्दी करतात.

**व्यावसायिकांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य**

**ठोसेघर धबधबा परिसरात काही हॉटेल्स आहेत. त्या ठिकाणी नाश्त्यापासून शाकाहारी, मांसाहारी जेवण उपलब्ध करून दिले जाते. तसेच चहा, कॉफी, अंडा भुर्जी, वडापाव, भजी याचे गाडे स्थानिक भूमिपुत्र लावत असतात. त्यातून त्यांना सहा महिने रोजगार उपलब्ध होतो. मात्र यावर्षी पावसाने ओढ दिल्यामुळे व्यवसायिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. शनिवारी पावसाळी पर्यटनाला प्रारंभ झाल्यानंतर मात्र त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलल्याचे चित्र पाहायला मिळाले.**

# तोपर्यंत बुलडोझर चालतच राहणार : एकनाथ शिंदे



**मुंबई:** केवळ मुंबई, पुणे, ठाण्यातच नव्हे तर जिथे जिथे अवैध व्यापार सुरू आहे तिथे तिथे अमली पदार्थांचा समूळ नायनाट होईपर्यंत बुलडोझर चालतच राहणार, असा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला. राज्यभरात पोलीस आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्यावर तरुणाईला नासवणाऱ्या अमली पदार्थांची पाळीमुळे खणून काढण्याची जबाबदारी देण्यात आली आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

पुण्यातील एका पबमध्ये अल्पवयीन मुले अमली पदार्थांचे सेवन करीत असल्याचा प्रकार उघडकीला आला. त्यानंतर ज्या ठिकाणी अमली पदार्थांची विक्री केली जाते, साठा केला जातो अशा ठिकाणांवर कारवाई करून बुलडोझर द्वारे ती निस्तनाभूत करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यानुसार केवळ पुण्यातच नव्हे तर मुंबई, ठाणे, नवी मुंबई या ठिकाणीही अमली पदार्थांच्या विरोधात मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेची व्याप्ती वाढवून ती राज्यभर राबविण्याचे आदेश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहे.

**कोणी कितीही मोठा असला तरी...**

अमली पदार्थांची विक्री करणारा, साठवणूक करणारा, मोठा पुरवठादार, असा कोणी कितीही मोठा असला तरी त्याची गय केली जाणार नाही. सरकार उघड्या डोळ्याने तरुण पिढी बरबाद होताना पाहू शकत नाही. जोपर्यंत शहर आणि संपूर्ण राज्य अमली पदार्थमुक्त होत नाही, तोपर्यंत बुलडोजर फिरतच राहणार, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**इंद्रायणी प्रदूषणमुक्त करणार**

इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्याचा सरकारचा निर्धार आहे. मी स्वतः पालखी सोहळ्याला उपस्थित राहणार आहे.मला तिथे पाचारण करण्यात आले आहे. त्यावेळी इंद्रायणी नदीची पाहणी करून जिल्हाधिकारी आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील, असे शिंदे यांनी सांगितले.

**खड्ड्यातून पांढरा पैसा करणाऱ्यावरही बुलडोझर**

मुंबई शहरांत अनेकांनी खड्डे दुरुस्तीच्या नावाखाली पैसा पांढरा करण्याचे उद्योग मोठ्या प्रमाणावर केले आहेत. त्यांच्यावरही बुलडोझर चालवल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देत शिंदे यांनी शिवसेना उद्धव ठाकरे गटावर निशाणा साधला आहे. मुंबई महापालिका सध्या प्रशासकांच्या अखत्यारीत असली तरी महापालिकेवर दीर्घाकाल शिवसेनेची सत्ता राहिली आहे. विधानसभा निवडणूक पार पडल्यानंतर राज्यातील महापालिका निवडणुकाही होणार आहेत. त्या अनुषंगाने शिंदे यांनी ठाकरे गटाला लक्ष्य केले आहे. मुंबई महापालिकेवर सत्ता प्रस्थापित करून शिवसेना ठाकरे गटाला निस्तनाबूत करण्याचा भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गटाचा प्रयत्न असणार आहे.

# नाट्यचित्र सोसायटी पुनर्विकसनाचा वाद उच्च न्यायालयात !

## रहिवाशांवर चिंतेचे सावट



**पुणे :** सोसायटीचे डिम्ड कन्वेयन्स मान्य करण्याच्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,पुणे यांच्या आदेशाला नाट्यचित्र सहकारी गृहरचना संस्था मर्यादित (कलाग्राम) सोसायटी(कोथरूड) च्या मूळ जागामालक व विकसकाकडून उच्च न्यायालयात रिट याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे तसेच सोसायटीचे अध्यक्ष-सचिवांनाही प्रतिवादी केले आहे.त्यामुळे ६५ फ्लॅट्स आणि २४ दुकाने असलेल्या या सोसायटीच्या पुनर्विकास प्रकल्पात कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या आहेत आणि रहिवाशांवर चिंतेचे सावट पसरले आहे.

कोथरूड, डावी भुसारी कॉलनी येथील नाट्यचित्र सहकारी गृहरचना संस्था मर्यादित (कलाग्राम सोसायटी) चे सर्व सभासद तसेच चेअरमन भरत मराठे व सेक्रेटरी अशोक लोहार यांच्या विरोधात, मूळ जागामालक श्री. शिंदे यांच्या वतीने ही याचिका २५ जून २०२४ रोजी दाखल करण्यात आली आहे.पॉवर ऑफ ऍटर्नी होल्डर व मूळ विकसक जी एस असोसिएटस तर्फे कविता श्यामराव गवळी यांनी उच्च न्यायालयात ही याचिका दाखल केली आहे. याचिकेत त्यांनी सोसायटीच्या ५/१२/२०१९ च्या डीम्ड कन्व्हेयन्सलाच आव्हान दिले आहे . तसेच एकूण शिल्लक एफ एस आय ५०२ चौरस मीटर कोणाही त्रयस्थ (थर्ड पार्टी )विकसकास व सोसायटीला वापरण्यास मज्जाव केला आहे. त्यामुळे सदर सोसायटीच्या पुनर्विकासाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या सोसायटीची आधीच खूप दुर्दशा झाली असून 'डी' विंग खचली आहे, त्यामुळे येथील सभासद भयभीत झाले आहेत. त्यातच आता उच्च न्यायालयात ही याचिका दाखल झाल्यामुळे सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे येथील रहिवासी भवितव्याबाबत चिंताक्रांत झाले आहेत.

# वारकऱ्यांसाठी कायदेविषयक जागृती शिबीर

## भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेजचा उपक्रम

**पुणे:** पंढरपूर वारीच्या निमित्ताने भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेजच्या कायदेविषयक साहाय्यता केंद्राने वारीच्या काळात वारकऱ्यांना त्यांच्या हक्कांबद्दल कायदेशीर जागृती करण्यासाठी मोहिम आयोजित केली. यावर्षी 'माझे मृत्युपत्र, माझी जबाबदारी' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. भारती विद्यापीठ विधी शाखेच्या अधिष्ठाता आणि न्यू लॉ कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. उज्वला बेंडाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डॉ. रोहित सुरवसे यांच्या समन्वयाने आयोजित केले गेले. ॲडव्होकेट दत्तात्रय माळी यांच्यासह अनेक विद्यार्थी या शिबिरासाठी उपस्थित होते.या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला.



पहिले शिबीर मोशी येथे २८ जून २०२४ रोजी यशस्वीपणे पार पडले, जिथे 'रामकृष्ण प्रासादिक दिंडी क्रमांक २२१' चे वारकरी उपस्थित होते. या प्रसंगी महाविद्यालयाने दिंडीला दत्तक घेतले आणि वर्षभर त्यांना कायदेशीर साहाय्य प्रदान करण्याची हमी दिली तसेच कायदेशीर जागृती मोहिमेत त्यांच्या सहभागासाठी प्रमाणपत्र दिले.

# कै. श्रीपाल आलासे (काका) कुरुंदवाड अर्बन बँकेची ६९ वी सर्व साधारण सभा खेळीमेळीत

## सभासदांना १५% लाभांश जाहीर . सभासदातून समाधान

**कुरुंदवाड :** स्वातंत्र्य सेनानी कै . श्रीपाल आलासे (काका ) कुरुंदवाड अर्बन को ऑप बॅकेची ६९ वी वार्षीक सर्वसाधारण सभा जैन सांस्कृतीक भवन येथे पार पडली . यावेळी चेअरमन प्रदिप पाटील अध्यक्षस्थानी होते तर माजी चेअरमन संचालक अरुण आलासे प्रमुख उपस्थित होते .

प्रारंभी संचालक दिपाली पाटील यांनी मान्यवरांना श्रद्धांजली चा ठराव मांडला संस्थेचा आढावा घेऊन प्रास्ताविक करत चेअरमन प्रदिप पाटील उपस्थित सर्वच मान्यवर व सभासदाचे स्वागत करून म्हणाले बँकेची ६९ वर्षातील झालेली प्रगती सभासदांचा विश्वास यामुळे बँकेने गरुड भरारी घेतली आहे . यामुळे कोल्हापुर सांगली जिल्ह्यातील अग्रणी अर्बन बँक म्हणून नावारुपाला आली आहे . या



वेळी बोलताना माजी चेअरमन अरुण आलासे म्हणाले कुरुंदवाड सारख्या निमशहरी भागामध्ये कै . श्रीपाल आलासे यांनी बँकेचे वटवृक्ष केले आहे . बँक ६९ वर्षात सभासद ठेवीदार कर्जदार यांच्या विश्वासाने भरारी घेतली आहे . म्हणून सन २०२३/ २४ साला करिता १५% लांभाश जाहीर करत आहे असे जाहीर करताच सभासदांनी टाळ्यांच्या गजर केला . यावेळी माजी चेअरमन अरुण आलासे यांनी आता तात्काळ तुमच्या बँक खात्यावर जमा केल्याचे जाहीर केले . तात्काळ बँक खात्यात लाभांश जमा करणारी एकमेव बँक आहे .

विषय पत्रीकेचे वाचन बँकेचे मुख्य कार्यकारीधिकारी शांतीनाथ कनवाडे यांनी केले . यावेळी सभासदांनी सर्व विषयांना एकमतानी मंजुरी दिली . यावेळी सभासदांनी सुचना मांडल्या असता चेअरमन प्रदिप पाटील मुख्य व्यवस्थापक शांतिनाथ कनवाडे यांनी सभासदानां समाधानकारक उत्तरे दिली . मुख्य शाखा अधिकारी सुकुमार जामदार यांनी ठेवीचा उद्दिष्ट पूर्ण केले बद्दल यांचेसह इतर अधिकारी कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला यावेळी व्हा चेअरमन सुधाकर पाटील बँकेचे संचालक बाळासो नाईक नंदकुमार पाटील रेश्मा पाटील सुनील पाटील इकबाल पटवेगार सुजाता भ बीरे ओंकार माळी निखिल आलासे महावीर थोटे माजी नगराध्यक्ष अक्षय आलासे धनपाला आलासे एडवोकेट सचिन कटारे कपिल देमापुरे चार्टर्ड अकाउंटंट भरत चौगुले विनोद पाटील वैजनाथ बिरंजे माजी नगराध्यक्ष दादासो पाटील वैभव उगळे सदाशिव माळी गुंडू दळवी मोन्नापा चौगुले आप्पासो जोंग लक्ष्मण चौगुले सलिम मुल्ला यांच्या सह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते . या वेळी शेवटी आभार महादेव धनवडे यांनी मांडले

आजच्या विशेष सर्वसाधारण सभेचे वैशिष्ट्य म्हणजे १५% डिव्हिडंट चेअरमन प्रदीप पाटील यांनी जाहीर करताच अवघ्या दहा मिनिटात सर्व सभासदांच्या खात्यावर जमा झाल्याचा मेसेज सभासदांच्या भ्रमणध्वनी वरती आल्याने सभासदांच्या समाधान पसरले होते